मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड' दर्शन आता अवघ्या 500 रुपयांत होणार..!

## आमदार शंकर जगताप यांच्या सूचनेला यश, ऐतिहासिक, धार्मिक आणि विज्ञानाचा अनुभव; पर्यटनाला मिळणार नवी चालना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशांतर्गत पर्यटनाला चालना देण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनातून प्रेरणा घेत आणि स्थानिक पर्यटनाला वाव देण्याच्या उद्देशाने आमदार शंकर जगताप यांनी पुणे महानगर परिवहन महामंडळाला (पीएमपी) पुणे दर्शनच्या धर्तीवर 'पुणे व पिंपरी-चिंचवड दर्शन' (बससेवा क्र. २) ही विशेष पर्यटन सेवा सुरू करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार प्रवाशांच्या सेवेसाठी ही बससेवा दाखल होणार आहे. यामुळे आता पर्यटकांना अवघ्या ५०० रुपयांत शहरांतील समृद्ध वारसा, संस्कृती आणि पर्यटन वैभव जवळून अनुभवता येणार आहे.




आमदार शंकर जगताप यांनी २७ मे २०२६ रोजी पीएमपीएल प्रशासनासोबत या संदर्भात विशेष बैठक घेतली होती. सार्वजनिक बससेवेच्या माध्यमातून शहरातील पर्यटनाला चालना मिळावी, अशी सूचना त्यांनी केली होती. या सूचनेची दखल घेत पीएमपी प्रशासनाने तातडीने या सेवा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. ही सहल धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक अशा सर्व पैलूंचा संगम आहे. या एका दिवसाच्या सहलीत सर्व वयोगटातील पर्यटकांना विज्ञान, इतिहास आणि निसर्गाचा अनुभव घेता येईल. या सहलीचे बुकिंग करण्यासाठी ऑनलाइन बुकिंग देखील सुरू करण्यात येणार आहे.

> पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी देशांतर्गत पर्यटनाला चालना देण्याचे जे आवाहन केले आहे, त्यातून प्रेरणा घेऊन आम्ही हा उपक्रम हाती घेतला. पिंपरी-चिंचवड या शहराला मोठा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा लाभला आहे. हा समृद्ध वारसा नागरिकांना, विशेषतः तरुण पिढीला आणि पर्यटकांना एकाच प्रवासात अनुभवता यावा, हा यामागील मुख्य उद्देश होता. अवघ्या ५०० रुपयांत 'पिंपरी दर्शन' ही विशेष बससेवा सुरू झाल्यामुळे सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात पर्यटन करता येईल. पीएमपी प्रशासनाने आमच्या सूचनेची तातडीने दखल घेतली. त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. या सुविधेमुळे शहरातील पर्यटनाला निश्चितच एक नवी चालना मिळेल आणि नागरिक याचा मोठ्या संख्येने लाभ घेतील, असा मला विश्वास आहे.
>
> - शंकर जगताप आमदार, चिंचवड विधानसभा .

### भेटीची प्रमुख स्थळे

चिंचवडचे महासाधू श्रीमन मोरया गोसावी मंदिर, मंगलमूर्ती वाडा, क्रांतिकारक चाफेकर बंधू स्मारक/वाडा, सायन्स पार्क, रावेतचे इस्कॉन मंदिर यांचा समावेश आहे.

# पंतप्रधान कार्यकाळाच्या तपपूर्ती निमित्त देशात प्रथमच 'नरसिंह महायज्ञ' : माजी खासदार अमर साबळे

## भारतीय जनता पक्षाच्या वतीने पुणे येथील इस्कॉन श्रीकृष्ण मंदिरात "नरसिंह महायज्ञ" करण्यात आला

**पिंपरी | प्रतिनिधी**

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान कार्यकाळाला ९ जून रोजी १२ वर्ष म्हणजेच एक तप पूर्ण झाले आहे. २०४७ पर्यंत भारत विकसित राष्ट्र म्हणून जगात सक्षमपणे उभे रहावे हा पंतप्रधानांचा संकल्प पूर्ण व्हावा, तसेच नरेंद्र मोदी यांना दीर्घायुष्य आणि अध्यात्मिक बळ लाभावे म्हणून देशात सर्व प्रथम भारतीय जनता पक्षाच्या वतीने पुणे येथील इस्कॉन श्रीकृष्ण मंदिरात "नरसिंह महायज्ञ" करण्यात आला अशी माहिती संयोजक व माजी खासदार अमर साबळे यांनी दिली.



मंगळवारी (दि. ९ जून) सायंकाळी कात्रज, पुणे येथील इस्कॉन श्रीकृष्ण मंदिरात संपन्न झालेल्या या नरसिंह महायज्ञात ५७ पुरोहित आणि लक्ष्मी नारायणाच्या स्वरूपात ५७ जोडप्यांनी ५४ आवर्तने करून यज्ञ आहुतीमध्ये सहभाग घेतला. अत्यंत भक्तिमय आणि प्रसन्न वातावरणात यावेळी भजन कीर्तनाचा जागर करण्यात आला. श्रीकृष्णाची आरती करण्यात आली. तसेच सर्वांना संयोजकांच्या वतीने माजी खासदार अमर साबळे आणि प्रसेनजीत फडणवीस हस्ते भगवद्गीता ग्रंथ वाटप करण्यात आले. महाप्रसाद नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी इस्कॉन श्रीकृष्ण मंदिर समितीचे उपाध्यक्ष श्वेत दिप दास, रेवती पती दास, तसेच कौस्तुभ प्रभु दास, गोविंद प्रसाद दास, ध्रुव महाराज दास यांनी सहभाग घेऊन व्यवस्थापन केले. माजी खासदार अमर साबळे आणि प्रसेनजीत फडणवीस, वेणू साबळे, सम्यक साबळे, सुजाता पालांडे, विनायक गायकवाड, ममता गायकवाड, विजय शिनकर, अजय पाताडे, महेंद्र बाविस्कर, अजित कुलथे, कैलास सानप, युवराज लांडे, ललित झुंझुनवाला, हनुमंत लांडगे, सुनील लांडगे, अनिता वाळुंजकर, गणेश वाळुंजकर, दिलीप राऊत, निर्गुण कवळे, संतोष टोणगे, सागर मारणे, स्वाती देशमुख, अनघा रुद्र, मनोज देवळेकर, किशोर शिनकर आदींनी या सोहळ्यात सहभाग घेतला होता.

# पिंपरी-चिंचवडमध्ये टोईंग कारवाईसाठी नवे कडक नियम

## गैरवर्तनाच्या तक्रारींनंतर वाहतूक विभागाचा निर्णय; नियमभंग झाल्यास अधिकाऱ्यांवरही जबाबदारी निश्चित

**पिंपरी | प्रतिनिधी**

टोईंग व्हॅनवरील कर्मचाऱ्यांची अरेरावी, उद्धट वर्तन तसेच गणवेश आणि ओळखपत्राविना सुरू असलेल्या कामकाजाच्या तक्रारींची दखल घेत वाहतूक विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. नवे पोलिस उपायुक्त विक्रांत देशमुख यांनी पदभार स्वीकारल्यानंतर टोईंग कारवाईतील शिस्त, पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी कर्मचाऱ्यांसह संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश देत कडक आदेश जारी केले आहेत.

शहरात वाहतूककोंडी कमी करण्यासाठी आणि 'नो पार्किंग'मधील वाहनांवर कारवाई करण्यासाठी टोईंग व्हॅनची मदत घेतली जाते. मात्र, वाहन उचलताना काही कर्मचाऱ्यांकडून वाहनचालकांशी अरेरावीची भाषा वापरणे, योग्य माहिती न देणे, उर्मटपणे बोलणे तसेच गणवेश आणि ओळखपत्राशिवाय काम करणे अशा तक्रारी वेळोवेळी समोर येत होत्या. याबाबत नागरिकांनी केलेल्या तक्रारींची विक्रांत देशमुख यांनी गंभीर दखल घेत संबंधित बाबींवर तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.



### अधिकाऱ्यांनाही राहणार जबाबदारी

» टोईंग कारवाईपूर्वी संबंधित कर्मचाऱ्यांकडे गणवेश, ओळखपत्र आणि आवश्यक कागदपत्रे आहेत की नाहीत, याची खात्री करण्याची जबाबदारी वाहतूक शाखेतील प्रभारी अधिकारी आणि अंमलदारांवर सोपविण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास केवळ कर्मचारीच नव्हे तर संबंधित अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरले जाणार असल्याचा स्पष्ट इशारा आदेशातून देण्यात आला आहे. यामुळे टोईंग कारवाई अधिक जबाबदार आणि नागरिकाभिमुख होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

विक्रांत देशमुख यांनी काढलेल्या आदेशात टोईंग कारवाईदरम्यान गणवेशाशिवाय कोणत्याही कर्मचाऱ्यास काम करण्यास परवानगी नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी अधिकृत ओळखपत्र गळ्यात परिधान करणे बंधनकारक करण्यात आले आहे. आदेशाचे पालन न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामकाज करण्यास परवानगी दिली जाणार नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय टोईंग करणाऱ्या सर्व वाहनांवर आवश्यक परवाने, वैध कागदपत्रे आणि अधिकृत माहिती दर्शनी भागात स्पष्टपणे प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. आवश्यक माहिती नसलेल्या वाहनांकडून टोईंग कारवाई होऊ नये, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

### वाहनचालकांकडून समाधान

» टोईंग कारवाईच्या नावाखाली काही कर्मचाऱ्यांकडून होणाऱ्या गैरवर्तनाबाबत नागरिकांमध्ये नाराजी होती. त्यामुळे वाहतूक विभागाने थेट आदेश काढून जबाबदारी निश्चित केल्याबद्दल अनेक वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले आहे. नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई व्हावी, मात्र ती कायदेशीर आणि शिस्तबद्ध पद्धतीनेच व्हावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### आदेशातील प्रमुख मुद्दे

» गणवेशाशिवाय कोणत्याही टोईंग कर्मचाऱ्यास कारवाईची परवानगी नाही
» सर्व कर्मचाऱ्यांनी अधिकृत ओळखपत्र परिधान करणे बंधनकारक
» टोईंग वाहनांवर परवाने व आवश्यक माहिती प्रदर्शित करणे आवश्यक
» नियमांचे पालन होत असल्याची खात्री प्रभारी अधिकाऱ्यांनी करावी
» नियमभंग झाल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित होणार

# मराठी पत्रकार संघाच्या पुणे जिल्हाध्यक्षपदी संजय मराठे यांची नियुक्ती

## मुंबईतील महाअधिवेशनात नियुक्तीपत्र प्रदान; पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि संघटन बळकटीसाठी काम करण्याचा निर्धार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे गुरव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा ज्येष्ठ पत्रकार संजय मराठे यांची मराठी पत्रकार संघाच्या पुणे जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर, नरीमन पॉईंट येथे आयोजित मराठी पत्रकार संघाच्या महाअधिवेशन २०२६ दरम्यान संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

मंगळवार (दि. ९) रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत यशवंतराव चव्हाण सेंटर, नरीमन पॉइंट, मुंबई येथे अधिवेशन उत्साहात संपन्न झाले. या महाअधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल जिष्णू देव वर्मा होते. व्यासपीठावर विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्रेरक वक्ते गौर गोपाल दास, सकाळ माध्यम समूहाचे मुख्य संपादक निलेश खरे, एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशिक, पुढारी माध्यम समूहाच्या मल्टीमीडिया संपादक मृणालिनी नानिवडेकर, राज्यपालांचे सचिव प्रशांत ननावरे, मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.






पत्रकारिता क्षेत्रातील योगदान, सामाजिक प्रश्नांबाबतची संवेदनशीलता आणि संघटनात्मक कार्यातील सक्रिय सहभाग याची दखल घेत संजय मराठे यांची पुणे जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. नियुक्तीनंतर त्यांनी पत्रकारांच्या समस्या, हक्क आणि पत्रकारिता क्षेत्राच्या विकासासाठी कटिबद्ध राहून काम करण्याचा निर्धार संजय मराठे यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

संजय मराठे यांच्या नियुक्तीमुळे पुणे जिल्ह्यातील पत्रकारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली संघाचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे जाईल, असा विश्वास देखील व्यक्त केला जात आहे.

कार्यक्रम प्रसंगी मराठी पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष किरण जोशी यांनी प्रास्ताविक केले. तर उपाध्यक्ष विवेक इनामदार यांनी आभार मानले. संदीप चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी राज्यभरातून आलेल्या पत्रकार सदस्यांनी त्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्या यावेळी मांडल्या. याप्रसंगी पिंपरी चिंचवड शहरातील आदी पत्रकार बांधव आणि भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे महापालिकेला बॉम्बस्फोटाची धमकी; मुख्य इमारत रिकामी

## ई-मेलमुळे प्रशासनात खळबळ; बॉम्ब शोधक पथक, पोलीस आणि सायबर विभागाचा कसून तपास

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातून एक मोठी बातमी समोर येत असून, महापौर कार्यालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी मेलद्वारे देण्यात आली आहे. यानंतर मोठी खळबळ उडाली असून, सुरक्षेचा उपाय म्हणून महापालिकेतील कर्मचारी आणि नागरिकांना कार्यलयातून तातडीने बाहेर पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नेमका हा मेल कुणी केला? याबाबतची कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या सूचनेनुसार संपूर्ण मुख्य इमारत रिकामी करण्यात आली असून बॉम्ब शोधक पथकाकडून शोधकार्य चालू आहे. शोधकार्य पूर्ण झाल्यानंतर मुख्य इमारतीचे कामकाज चालू करण्यात येणार आहे.

मिळालेल्या ई-मेलनुसार पुणे महापौर कार्यालय, नागपूरमधील काही ठिकाणे तसेच RSS मुख्यालयाला लक्ष्य करण्याची धमकी देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. ई-मेलमध्ये IED बॉम्बस्फोटाचा उल्लेख करण्यात आला असून, काही विशिष्ट वेळा आणि तारखांचाही संदर्भ देण्यात आला आहे.

धमकीचा ई-मेल मिळताच पोलीस, बॉम्ब शोधक व नाशक पथक तसेच सायबर विभाग सतर्क झाला असून, ई-मेलची सत्यता आणि त्यामागील व्यक्तीचा शोध घेण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. ई-मेल कोणत्या ठिकाणाहून पाठवण्यात आला, तो खरा आहे की बनावट, याची तपासणी यंत्रणांकडून केली जात आहे.

सध्या कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आलेली नसून, सुरक्षा यंत्रणांनी खबरदारीचा उपाय म्हणून संबंधित परिसरात सुरक्षा वाढवली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव सर्व कर्मचाऱ्यांना इमारत रिकामी करण्यास सांगण्यात आल्याने मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी झाली आहे.




### महापौर कार्यालयाला बॉम्बची धमकी

» पुणे महापालिकेच्या महापौर कार्यालयाला ई-मेलद्वारे बॉम्बस्फोटाची धमकी मिळाल्याने प्रशासनात एकच खळबळ उडाली. धमकीची माहिती मिळताच महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मुख्य इमारत तातडीने रिकामी करण्याचे आदेश दिले. कर्मचारी, अधिकारी आणि नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. त्यानंतर बॉम्ब शोधक व नाशक पथकाने संपूर्ण परिसराची तपासणी सुरू केली. धमकीचा ई-मेल नेमका कुणी पाठवला याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही. सायबर विभागही ई-मेलचा स्रोत शोधण्याचे काम करत आहे. सुरक्षेच्या दृष्टीने परिसरात पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे.

### तपास पूर्ण होईपर्यंत सतर्कता कायम

» धमकीनंतर पुणे महापालिकेच्या मुख्य इमारतीत आणि परिसरात सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे. बॉम्ब शोधक पथकाकडून प्रत्येक विभागाची सखोल तपासणी सुरू असून अद्याप कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आलेली नाही. खबरदारीचा उपाय म्हणून सर्व कर्मचाऱ्यांना इमारत रिकामी करण्यास सांगण्यात आले. त्यामुळे मुख्य प्रवेशद्वार आणि परिसरात काही काळ मोठी गर्दी झाली होती. पोलीस आणि सायबर विभाग संयुक्तपणे तपास करत असून ई-मेलचा उगम शोधण्यावर भर दिला जात आहे. तपास पूर्ण होईपर्यंत सुरक्षा यंत्रणा उच्च सतर्कतेवर राहणार आहेत.

### RSS मुख्यालयाचाही ई-मेलमध्ये उल्लेख

» धमकीच्या ई-मेलमध्ये पुणे महापौर कार्यालयासह नागपूरमधील काही महत्त्वाच्या ठिकाणांचा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) मुख्यालयाचाही उल्लेख करण्यात आला आहे. ई-मेलमध्ये आयईडी बॉम्बस्फोटाचा दावा करण्यात आला असून काही विशिष्ट वेळा आणि तारखांचा संदर्भ देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत. धमकी खरी आहे की खोडसाळपणातून पाठवण्यात आलेला संदेश आहे, याची पडताळणी सुरू आहे. संबंधित ई-मेलचे तांत्रिक विश्लेषण करून त्यामागील व्यक्ती किंवा गटाचा शोध घेण्याचे काम तपास यंत्रणांकडून करण्यात येत आहे.

# तीन महिने भिडे पुल बंद राहणार; वाहतुकीचा मोठा खोळंबा

## भिडे पुलाच्या वरच्या बाजूस बांधण्यात येत असल्याने कामादरम्यान सुरक्षिततेच्या दृष्टीने पुलावरील वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरांसाठी अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या आणि मध्यवर्ती भागांना जोडणाऱ्या भिडे पुलावरील वाहतूक पुढील तीन महिन्यांसाठी पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. मेट्रोच्या सुरू असलेल्या कामामुळे हा निर्णय घेण्यात आला असून वाहनचालकांना आता पर्यायी मार्गांचा वापर करावा लागणार आहे.

महामेट्रोकडून मिळालेल्या माहितीनुसार, डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानकाला मुख्य मार्गाशी जोडण्यासाठी विशेष पादचारी पूल उभारण्याचे काम सुरू आहे. हा पूल भिडे पुलाच्या वरच्या बाजूस बांधण्यात येत असल्याने कामादरम्यान सुरक्षिततेच्या दृष्टीने पुलावरील वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे.

प्रशासनाच्या आदेशानुसार ९ जूनच्या मध्यरात्रीपासून ते ५ सप्टेंबरपर्यंत भिडे पुलावरून सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीस बंदी असेल. काम जलदगतीने पूर्ण करण्यासाठी महामेट्रोकडून प्रयत्न सुरू असून नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे.

दरम्यान, या निर्णयामुळे दररोज या मार्गाचा वापर करणाऱ्या हजारो वाहनचालकांना मोठा फटका बसणार आहे. शहरातील मध्यवर्ती भागातील वाहतुकीवर याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांनी नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

भिडे पुलाचे शहराच्या वाहतूक व्यवस्थेतील महत्त्व लक्षात घेता, नियोजित मुदतीत काम पूर्ण करून वाहतूक पूर्ववत सुरू करावी, अशी अपेक्षा पुणेकरांकडून व्यक्त केली जात आहे.



### भिडे पूल वाहतुकीस बंद

» पुणे शहरातील महत्त्वाचा भिडे पूल ९ जूनच्या मध्यरात्रीपासून ५ सप्टेंबरपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानकाला मुख्य मार्गाशी जोडणारा पादचारी पूल उभारण्याचे काम सुरू असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. कामादरम्यान नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वाहतूक बंद ठेवण्यात येणार असून वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागेल. या निर्णयामुळे शहरातील मध्यवर्ती भागातील वाहतुकीवर ताण वाढण्याची शक्यता आहे. महामेट्रोकडून काम नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू असून वाहतूक पोलिसांनी नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# पुण्यात ॲमिनिटी स्पेसवर उद्याने विकसित करण्याचा प्रस्ताव

## शहरातील मोकळ्या जागांचा वापर सार्वजनिक उद्याने व हरित पट्ट्यांसाठी करण्याची महापालिकेची योजना

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील वाढते नागरीकरण आणि झपाट्याने कमी होत चाललेले हरित क्षेत्र लक्षात घेता महापालिकेच्या ताब्यातील मोठ्या ॲमिनिटी स्पेसवर सार्वजनिक उद्याने आणि विकसित करण्याच्या हालचाली राज्य सरकारच्या स्तरावर सुरू झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यासाठी आग्रही असल्याचे सांगण्यात येत असून, महापालिकेच्या माध्यमातून यासंबंधीचा प्रस्ताव मांडला असल्याचे सांगण्यात आले.

राज्याच्या 'एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली' (यूडीपीसीआर) मध्ये करण्यात आलेल्या बदलांमुळे बांधकाम प्रकल्पांकडून सार्वजनिक सुविधांसाठी मिळणाऱ्या ॲमिनिटी स्पेसमध्ये मोठी घट झाली आहे. त्यामुळे पुणे महापालिकेसमोर भविष्यात शाळा, क्रीडांगणे, दवाखाने आणि उद्याने उभारण्यासाठी आवश्यक जागांची कमतरता निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

याच पार्श्वभूमीवर महापालिकेच्या ताब्यात आलेल्या मोठ्या ॲमिनिटी स्पेसवर इतर बांधकामांना परवानगी न देता तेथे सार्वजनिक उद्याने आणि हरित पट्टे विकसित करण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. शहरातील नागरिकांना अधिकाधिक मोकळ्या आणि हिरव्यागार जागा उपलब्ध करून देण्यावर प्रशासनाचा भर राहणार असल्याचे समजते.

उपलब्ध ॲमिनिटी स्पेसचा वापर हरित क्षेत्र वाढवण्यासाठी करण्याच्या दृष्टीने महापालिका प्रशासनाने स्वतंत्र मोहीम सुरू करण्याची तयारी केली आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनीही या संकल्पनेला सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे समजते. महापालिकेकडून यासंदर्भातील प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून, राज्य सरकारकडून लवकरच मंजुरी मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



### सार्वजनिक उद्यानांमुळे नागरिकांना मोठा लाभ

**» महापालिकेच्या ताब्यातील उपलब्ध ॲमिनिटी स्पेसचा वापर सार्वजनिक उद्याने आणि हरित पट्टे विकसित करण्यासाठी केल्यास नागरिकांना मोठा लाभ होणार आहे. वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर शहरात अधिक झाडे, खुली मैदाने आणि मनोरंजनासाठी जागा निर्माण होणार आहेत. मुलांसाठी खेळाची मैदाने, ज्येष्ठ नागरिकांसाठी फिरण्याचे मार्ग आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक सुविधा उपलब्ध होण्यास मदत होईल. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनीही या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती आहे. राज्य सरकारची मंजुरी मिळाल्यानंतर पुण्याच्या हरित विकासाला नवी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**

### हरित पुण्यासाठी नवी दिशा

**» पुणे शहरातील झपाट्याने वाढणारे नागरीकरण आणि कमी होत चाललेले हरित क्षेत्र लक्षात घेऊन महापालिकेच्या ताब्यातील मोठ्या ॲमिनिटी स्पेसवर सार्वजनिक उद्याने विकसित करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव पुढे आला आहे. नागरिकांना अधिक मोकळ्या जागा, पर्यावरणपूरक सुविधा आणि विरंगुळ्याची केंद्रे उपलब्ध करून देण्याचा यामागील उद्देश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारामुळे या संकल्पनेला गती मिळाली असून महापालिका प्रशासनानेही सकारात्मक भूमिका घेतली आहे. भविष्यात शहरातील पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आणि जीवनमान उंचावण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असल्याचे मानले जात आहे.**

### यूडीपीसीआर बदलांमुळे जागांची कमतरता

**» राज्याच्या एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील (यूडीपीसीआर) बदलांमुळे सार्वजनिक सुविधांसाठी मिळणाऱ्या ॲमिनिटी स्पेसमध्ये मोठी घट झाली आहे. पूर्वी मोठ्या बांधकाम प्रकल्पांसाठी ५ ते १० टक्के जागा राखीव ठेवण्याची अट होती. मात्र, सुधारित नियमांनुसार २० हजार चौरस मीटरपर्यंतच्या प्रकल्पांसाठी ही अट रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे भविष्यात शाळा, क्रीडांगणे, दवाखाने आणि उद्याने उभारण्यासाठी जागेची टंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विशेषतः नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांवर या निर्णयाचा अधिक परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे.**

# थेऊरच्या श्री चिंतामणी गणपती मंदिराचे दरवाजे पुन्हा खुले; संवर्धनाची कामे पूर्ण

## महिनाभराच्या जतन-दुरुस्तीनंतर भाविकांसाठी दर्शन सुरू; महागणेश याग, मंत्रजागर आणि महाप्रसादाचे आयोजन

**पुणे | प्रतिनिधी**

अष्टविनायकांपैकी एक असलेल्या थेऊर (ता. हवेली) येथील श्री चिंतामणी गणपती मंदिराच्या जतन, संवर्धन आणि दुरुस्तीची कामे पूर्ण झाली असून, मंदिर बुधवार, दि. १० जून सकाळी १० वाजल्यापासून भाविकांच्या दर्शनासाठी पुन्हा खुले करण्यात आले आहे

महाराष्ट्र शासन आणि पुरातत्व विभागाच्या माध्यमातून मंदिराच्या संवर्धनासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीतून गाभारा, सभामंडप तसेच मंदिर परिसरातील विविध भागांची दुरुस्ती आणि सुशोभीकरणाची कामे करण्यात आली आहेत.

चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त केशव विध्वंस यांनी ही माहिती दिली. दि. १० मे ते ९ जून या कालावधीत मंदिराच्या ऐतिहासिक आणि धार्मिक वैशिष्ट्यांचे जतन करीत संवर्धनाची कामे पूर्ण करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

भाविकांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि सुविधायुक्त दर्शन मिळावे, यासाठी मंदिर परिसरातील विविध मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. तसेच, भाविकांना अधिक चांगला आध्यात्मिक अनुभव मिळावा, यासाठी विशेष नियोजन करण्यात आल्याचे मंदिर प्रशासनाने स्पष्ट केले. मंदिर दर्शनासाठी खुले करण्यापूर्वी विविध धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले आहे.

मुख्य पुजारी आगलावे बंधू यांच्या माहितीनुसार श्री महागणेश याग, सहस्रावर्तन, मंत्रजागर तसेच महाप्रसाद वितरणाचे कार्यक्रम होणार आहेत. यानिमित्ताने मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून, मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. जतन-संवर्धनाची कामे पूर्ण झाल्यानंतर सुमारे महिनाभराने मंदिराचे दरवाजे पुन्हा भाविकांसाठी खुले होत असल्याने गणेशभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



### महिनाभरानंतर दर्शनाचा लाभ

**» अष्टविनायकांपैकी एक असलेल्या थेऊर येथील श्री चिंतामणी गणपती मंदिराचे जतन, संवर्धन आणि दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्यानंतर मंदिर पुन्हा भाविकांसाठी खुले करण्यात आले आहे. १० मे ते ९ जून या कालावधीत मंदिर बंद ठेवून विविध कामे करण्यात आली होती. सुमारे महिनाभरानंतर मंदिराचे दरवाजे उघडल्याने गणेशभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. बुधवार, १० जून रोजी सकाळी १० वाजल्यापासून भाविकांना दर्शनासाठी प्रवेश देण्यात आला आहे.**